RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# बीड जिल्हयातील शेतमजूर वितरण व समस्यांचा अभ्यास

**प्रा. डॉ. एन. के. वाघमारे -** सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक, भूगोल विभाग प्रमुख, इंदिरा जांधी महाविदयालय, सिडको, नांदेड
**श्री. संतोष सिताराम सोंडगे -** संशोधक विदयार्थी , भूशास्त्र संकुल, स्वा.रा. ती. मराठवाडा विदयापीठ, नांदेड.

**जोषवारा**

*भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतातील 65 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहे. यामध्ये शेतमजूरांचा वाटा महत्त्वाचा आहे. कारण भारतीय शेतीमध्ये यंत्रापेक्षा मनुष्यबळाचा वापर जास्त प्रमाणात केला जातो. बीड जिल्हयामध्ये 48.29 टक्के लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. तर 29.75 टक्के शेतमजूर आहेत. शेतमजुरांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रीयांचे प्रमाण जास्तआहे. बीड जिल्हयातील 13 टक्के शेती बागायती व 87 टक्के शेती कोरडवाहू आहे. त्यामुळे शेतमजुरांना वर्षभर मजुरी मिळत नाही. ग्रामीण भागामध्ये इतर रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने शेतमजुरांना शेतमजुरीवरच अवलंबून रहावे लागते. त्यामुळे शेतमजुराच्या कुटुंब निर्वाहाच्या, आरोग्याच्या, मुलांच्या शिक्षणाच्या अशा अनेक समस्या निर्माज झालेल्या आहेत. त्यासाठी सरकारने शेतमजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागामध्ये विविध उपक्रम हाती घेवून येथील भूमीवीम शेतकऱ्यांना म्हणजेच शेतमजुरांना जास्तीत जास्त रोजगार व आर्थिक उत्पन्न मिळवून देण्यावर भर देणे आवश्यक आहे.*

## 1.1 प्रस्तावना :-

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषी मानवाचा प्राचीन व मूलभूत व्यवसाय आहे. कृषी व्यवसायामुळेच मानवाने भटके जीवन सोडून स्थायी वसाहती निर्माण केल्या. कृषी हा आजही अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतातील सुमारे 65 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील बीड जिल्हयामध्ये देखील वेगळी परिस्थिती नसून एकुण लोकसंख्येपैकी 2011 च्या आकडेवारीनुसार 48.29 टक्के लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. तर 29.75 टक्के शेतमजुर म्हणून काम करतात.

बीड जिल्हा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास असल्यामुळे येथील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. त्यामुळे सहाजिकच या ठिकाणी शेतमजुरांचे प्रमाण देखील खुप आहे. 'दुसऱ्यांच्या मालकीच्या शेतीवर अंगमेहनतीने काम करुन जो मजुरी कमवितो तो शेतमजुर' अशी शेतमजुराची व्याख्या करता येते. ही मजूरी म्हणजेच मोबदला. हा मोबदला रोख पैशाच्या स्वरुपात अथवा उत्पादनातील हिश्याच्या स्वरुपात असू शकतो. असे शेतमजूर तीन प्रकारचे आढळतात. 1) भूमीहीन शेतकरी 2) अल्प भूधारक शेतकारी व 3) अत्यल्प भूधारक शेतकरी

## 1.2 अभ्यासाचे महत्त्व :-

शेतमजुराचे वर्गीकरण किंवा विभाजन दोन भागात करता येते. एक पुरुष मजूर व दोन स्त्री मजूर. पुरुष शेतमजुरांपेक्षा स्त्री शेतमजूरांचे प्रमाण नेहमीच जास्त राहिलेले दिसून येते. ग्रामीण भागात उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती असते. पण बऱ्याच कुटुंबाकडे आवश्यक तेवढी शेती नसते. त्याचबरोबर घरांमध्ये कुटुंबातील उदरनिर्वाहाच्या, आरोग्याच्या, शिक्षणाच्या अशा अनेक समस्या असतात. त्या सर्व समस्यांना घरातील करत्या पुरुष व स्त्रीला सामोरे जावे लागते. त्यामुळे दुसऱ्याच्या शेतात जाऊन शेतमजुरी करावी लागते. अशाप्रकारे ग्रामीण भागात शेतमजूर होण्याची कारणे व त्यांना येणाऱ्या अडचणी मोठया प्रमाणात दिसून येतात.

## 1.3 अभ्सासक्षेत्र :-

बीड जिल्हयाचे स्थान महाराष्ट्राच्या मध्य आग्नेयेस आहे. जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार $18^{o}$ 28' ते $19^{o}$ 28' उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार $74^{o}$ 54' ते $76^{o}$ 57' पूर्व आहे. जिल्हयाच्या उत्तरेस औरंगाबाद व पूर्वेस जालना, परभणी व लातूर, दक्षिणेस उस्मानाबाद तर पश्चिमेस अहमदनगर जिल्हा आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ 10693 चौ.कि.मी. असून जिल्हयामध्ये एकूण 11 तालुके आहेत. जिल्हयामध्ये बालाघाट पर्वतरागेंमुळे उत्तरेकडील सखल प्रदेश गंगथडी व उंचावरील प्रदेश बालाघाट असे दोन भाग पडलेले आहेत. बालाघाट विभागाची समुद्र सपाटीपासूनची उंची 610 मीटर ते 670 मीटर असून गंगथडी विभागाची उंची 365 ते 457 मीटर पर्यंत आहे. जिल्हयातील गोदावरी ही महत्त्वाची नदी असून गेवराई व माजलगाव तालुक्यांच्या सीमेवरुन वाहते. त्याचप्रमाणे मांजरा व सिंदखणा या जिल्हयातील इतर महत्त्वाच्या नदया असून त्यांचा उगम पाटोदा तालुक्यातील टेकडयावरुन होतो. जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे असून कमीतकमी तापमान $12^{o}$ से. व जास्तीत जास्त $39.6^{o}$ से. एवढे आहे. 2011 च्या जनगणनेनुसार बीड जिल्हयातील एकुण लोज संज्या 2,585,049 एवढी आहे व साक्षरतेचे प्रमाण 77 टक्के असून पुरुष व महिलांची टक्केवारी अनुक्रमे 85.6 व 67.8 एवढी आहे.



आकृती क्र. 1

1.4 **उदिदष्टये** :-

1) बीड जिल्हयातील शेतमजूर वितरणाचा अभ्यास करणे
2) शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती अभ्यासणे.
3) शेतमजुरांच्या समस्यांचा अभ्यास ज रजे.

1.5 **संशोधन पध्दती आणि माहिती संकलन** :-

प्रस्तुत शोध निबंध हा प्राथमिक व व्दितीयक तथ्यसंकलनावर आधारित आहे. प्राथमिक माहिती संकलित ज रण्यासाठी आष्टी व पाटोदा तालुक्यातील प्रत्येकी चार गावांची निवड करण्यात आली व प्रत्येक गावातील 5 शेतमजुरांना प्रश्नावली देण्यात आल्या. तसेच प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. तर व्दितीयक माहिती संज लित करण्यासाठी व्दितीयक माहिती स्त्रोतांचा उपयोग केला आहे. ही माहिती जिल्हा जनगणना पुस्तिका, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, भारत व महाराष्ट्र सरकारचे जनगणनेवरील अहवाल, जिल्हा सांख्यिज ीय ज ार्यालये व इंटरनेट, वृत्तपत्रे इत्यादींच्या कडून संकलित करण्यात आली.

1.6 **विश्लेषज** :-

1.6.1 **बीड जिल्हयातील शेतमजुरांचे वितरण** :-

तक्ता क्र. 1

बीड जिल्हयातील तालुकानिहाय शेतमजुरांचे वितरण (2001 व 2011)

| अ.क्र. | तालुका | 2001 | | | 2011 | | | एकुण बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण | पुरुष | स्त्रिया | एकुण | पुरुष | स्त्रिया | |
| 1 | बीड | 16.89 | 11.93 | 26.70 | 19.21 | 14.28 | 28.40 | 2.62 |
| 2 | जेवराई | 26.19 | 19.93 | 34.43 | 29.00 | 23.06 | 36.70 | 2.81 |
| 3 | माजलगाव | 41.08 | 32.38 | 55.51 | 44.88 | 38.03 | 55.33 | 3.80 |
| 4 | अंबाजोगाई | 31.88 | 24.86 | 45.90 | 32.71 | 26.61 | 43.67 | 0.84 |
| 5 | जे ज | 29.44 | 25.32 | 34.82 | 29.50 | 25.74 | 34.51 | 0.05 |
| 6 | पाटोदा | 17.80 | 14.30 | 22.26 | 23.74 | 20.06 | 28.22 | 5.94 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | आष्टी | 16.42 | 12.58 | 21.40 | 18.59 | 15.16 | 22.69 | 2.17 |
| 8 | धारुर | 28.61 | 22.08 | 39.79 | 40.09 | 33.85 | 48.92 | 11.48 |
| 9 | परळी | 26.70 | 19.37 | 41.43 | 31.34 | 24.51 | 44.14 | 4.64 |
| 10 | वडवणी | 33.79 | 28.82 | 40.65 | 33.11 | 29.88 | 37.35 | -0.69 |
| 11 | शिरुर (ज ा) | 15.65 | 12.30 | 19.42 | 21.00 | 16.99 | 25.68 | 5.35 |
| एकूण | | 25.66 | 20.08 | 34.30 | 28.39 | 23.25 | 35.88 | 2.73 |

संदर्भ :- बीड जिल्हा जनगणना पुस्तिका- 2001 व 2011

तक्ता क्र 1 व आकृती क्र 2 मध्ये जिल्हयातील 2001 व 2011मधील एकूण कामगारांपैकी शेतमजुरांचे प्रमाण तालुकानिहाय दर्शविले आहे. 2001 साली जिल्हयातील एकूण शेतमजुरांचे प्रमाण 25.66 टक्के असून सर्वात जास्त प्रमाण माजलगाव तालुक्यात 41.08 व सर्वात कमी प्रमाण शिरुर (का) तालुक्यात 15.65 टक्के आहे तर पुरुष शेतमजुरांमध्ये सर्वात जास्त प्रमाण माजलगाव तालुक्यामध्ये 32.38 असून सर्वात कमी प्रमाण बीड तालुक्यामध्ये 11.93 टक्के एवढे आहे. स्त्री शेतमजुरांमध्ये देखील सर्वात जास्त प्रमाण माजलगाव तालुक्यामध्येच 5.51 तर सर्वात कमी स्त्री शेतमजुर प्रमाण देखील शिरुर (का) तालुक्यामध्येच 19.42 टक्के एवढे आहे.

2011 च्या आकडेवारीनुसार जिल्हयातील एकूण शेतमजुरांचे प्रमाण 28.39 टक्के असून सर्वात जास्त प्रमाण माजलगाव तालुक्यामध्येच 44.88 आहे. तर सर्वात कमी प्रमाण आष्टी तालुक्यात 18.59 टक्के आहे. पुरुष शेतमजुरामध्ये सर्वात जास्त प्रमाण देखील माजलगाव तालुक्यामध्येच 38.03 असून सर्वात कमी प्रमाण देखील आष्टी तालुक्यामध्ये 15.16 टक्के आहे. स्त्री शेतमजुरांचे प्रमाण देखील सर्वात जास्त व सर्वात कमी अनुक्रमे माजलगाव (55.33) व आष्टी (22.69) तालुक्यामध्येच आहे. ( आकृती क्र. 2 )




**आकृती क्र. 2**

2001 व 2011 च्या आकडेवारीचे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की, सर्वच तालुक्यामध्ये पुरुष शेतमजुरांपेक्षा स्त्री शेतमजुरांचे प्रमाण खुपच जास्त आहे. त्याचबरोबर 2001 पेक्षा 2011 मध्ये शेतमजुरांच्या प्रमाणामध्ये घट होण्याऐवजी वाढच झालेली दिसून येते. ही एकूण वाढ 2.73 टक्के एवढी झाली आहे.

### 1.6.2 शेतमजुरांच्या समस्या :-

शेतमजुरांच्या समस्यांचा अभ्यास केला असता पुढीलप्रमाणे समस्या आढळून आल्या.

1) शेतमजुरांना वर्षातील काही महीनेच काम मिळते. साधारणपणे मार्च ते जूनच्या सुरुवातीपर्यंत मजुरीची गरज असताना देखील कामाअभावी घरीच बसावे लागते. त्यामुळे या कालखंडात आर्थिक अडचण निर्माण होऊन उपासमारीची वेळ येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

2) शेतमजुरांना शेतमालक ज्या दिवशी काम केले त्यादिवशी मजुरी देत नाही. त्यामुळे या शेतमजुरांना रोजच्या आर्थिक गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. एखादी अचानक अडचण निर्माण झाल्यास त्यांच्याकडे आवश्यक तेवढा पैसा राहत नाही. तेव्हा त्यांना अडचणींना सामोरे जाजे कठीण जाते.
3) शेतमजुरांचा जास्तीत जास्त वेळ दुसऱ्यांच्या शेतात काम करण्यात जातो. त्यामुळे ते कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष देऊ शकत नाहीत. यामुळे मुलांच्या शिक्षणामध्ये बऱ्याच वेळा खंड पडतो.
4) शेतमजुरांना दिल्या जाणाऱ्या मजुरीचे प्रमाण हे महागाईच्या तुलनेत बरेच कमी आहे. त्यामुळे शेतमजुरांच्या आर्थिक गरजा पूर्ण होत नाहीत.
5) शेतमजुरांना आर्थिक गरज पडल्यास त्यांना बऱ्याच वेळा सावकाराकडून व शेतमालकाकडून व्याजाने व उसनवारीने पैसे घ्यावे लागतात. त्यामुळे पैसे परत करणे कठीण जाते. अशा वेळेस त्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.
6) शेतमजुरांना वर्षभरातील जास्तीतजास्त काम शेतात जाऊन करावे लागते. त्यामुळे त्यांना स्वत:कडे जास्त लक्ष व वेळ देता येत नाही.
7) स्त्री शेतमजुरांना घरातील विविध कामे, मुलांना सांभाळणे इत्यादी कामे करुन शेतमजुरीचे काम करावे लागते. त्यामुळे त्यांना खूप त्रास सहन करावा लागतो.
8) शेतमजुरांचे शिक्षण प्राथमिक व माध्यमिक पर्यंतच झालेले दिसते.
9) शेतमजुरांच्या कुटुंबाचा अर्थार्जनाचा सर्वात मोठा भाग शेतमजुरी असल्याने त्यांना दुसरा पर्याय नसतो.
10) अधिकाधिक शेतमजुरांकडे शेतमजुरीला धरुन जोड व्यवसाय नाही. त्यामुळे त्यांना केवळ मजुरीच्या उत्पन्नावर अवलंबून रहावे लागते.
11) बऱ्याच गावांमध्ये आजही प्राथमिक आरोग्य केंद्रे नाहीत. त्यामुळे आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्यास त्यांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. परंतु, तिथे जाण्यासाठी पैसे उपलब्ध नसतात. त्यामुळे अनेक वेळा या शेतमजुरांना दुखणे अंगावर काढावे लागते.
12) शेतमजुरांचे शिक्षण अधिक झाले नसल्याकारणाने त्यांना शासनाच्या शेतमजुरांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती खुपच कमी प्रमाणात असलेली दिसून येते.
13) शेतमजुरांनी व्यावसायिक शिक्षण घेतले नसल्यामुळे त्यांना शेतमजुरीच्या उत्पन्नावरच अवलंबून रहावे लागते.

### 1.6.3 उपाययोजना :-

शेतमजुरांच्या अनेक समस्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी किंवा त्यांची तिव्रता कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना होणे आवश्यक आहे.

1) शासनाने ग्रामीण भागात शेतमजुरांसाठी विविध जोडव्यवसाय उपलब्ध होतील याकडे लक्ष दयावे.
2) शेतमजुरांना आर्थिक प्रश्नं नेहमी भेडसावत असतात. त्यामुळे शासनाने त्यांना उत्पन्न मिळेल असे प्रकल्प हाती घ्यावेत.
3) शेतमजुर स्त्रियांना विविध हस्तकौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात यावे, जेणेकरुन त्या स्वयंरोजगार मिळविण्यावर भर देतील.
4) शेतमजुरीचा निश्चित दर होणे आवश्यक आहे. जेणेकरुन शेतमालक मजुरीच्या बाबत त्रास देणार नाहीत. व शेतमजुरांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळेल.
5) ग्रामीण भागात आर्थिक साक्षरता निर्माण होईल याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.
6) सरकारच्या शेती व शेतमजुर यासाठी असणाऱ्या विविध योजना ग्रामीण भागातील सर्व तळागाळातील लोकांपर्यंत पोहचतील या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.
7) ग्रामीण भागात वेगवेगळया प्रकारचे गृहउदयोग सुरु करण्यात यावेत.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

8) ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी असणे आवश्यक आहे. कारण, विशेषत: स्त्रियांसाठी आरोग्याच्या अनेक समस्या असतात. त्यामुळे गावापातळीवर आरोग्य केंद्र असल्यास त्याचा फायदा स्त्री शेतमजुरांना मोठया प्रमाणात होईल.
9) ग्रामसभेविषयी समाजामध्ये जाणीव जागृती होणे आवश्यक आहे. यामुळे शेतमजुरांना आपल्या हक्कांची जाणीव होण्यास मदत होईल.
10) बचत गट, महिला मंडळे निर्माण केल्यास त्याचा फायदा या शेतमजुरांना विशेषत: स्त्रियांना होईल. त्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होईल.
11) ग्रामीण भागात शेतमजूर खाजगी सावकारांकडून कर्ज घेतात व परतफेडीच्या वेळेस सावकार जास्तीचे व्याज घेवून त्रास देतात. त्यामुळे खाजगी सावकारकीला आळा बसणे गरजेचे आहे.
12) शेतमजुरांच्या मुलांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य सरकारने करणे गरजेचे आहे. जेणेकरुन मुले शिकतील व शेतमजुरांची कुटुंबे आर्थिकदृष्टया सुधारतील.
13) ग्रामीण भागात शिक्षणविषयक जनजागृती होणे गरजेचे आहे. यामुळे शेतमजुरांना शिक्षणाचे फायदे कळतील व त्यांची मुले शिकतील.

1.7 **संदर्भ** :-

1. ढाके एस.व्ही., कृषी भूगोल, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
2. डॉ. विठ्ठल घारपुरे, लोकसंख्या भूगोल, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, -ाजपूर.
3. बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, 2001 व 2012
4. Census of India, Beed District Handbook, 2001 & 2011
5. Gazetter of India, Maharashtra State - Beed District.
6. www.beed.nic.in/ about the district.html/
7. www.censusindia.gov.in/2011-prov-results.
8. वृत्तपत्रे :-
   दै. लोकसत्ता
   दै. लोकमत